गोपनीय

परिपत्रक

क्रमांक. सीएलआर. ११९२/३९/सात  मुंबई, २८ ऑगस्ट, १९९२

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र देशी दारु नियम १९७३ च्या अंतर्गत नियम १५ मध्ये, देशी दारुचा साठा बंदीस्त वखार[ Warehouse/ Godown ]किती क्षेत्रफळाचे पाहिजे, याबाबत उल्लेख नसल्यामुळे अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क हे एक ट्रक सुध्दा साठा मावू शकत नाही. तरीही सीएल-२ अनुज्ञप्तींच्या मंजूरी देण्याबाबत शिफारस करतात. त्याबाबत अधीक्षकांकडे पत्र व्यवहार करण्याकरिता या कार्यालयाचा वेळेचा अपव्यय सुध्दा होतो. कांही अधीक्षक सूचना देऊन सुध्दा सीएल् २ अनुज्ञप्तीच्या जागेचे स्वत: निरीक्षण करीत नाहीत व नकाशावर सुध्दा स्वाक्षरी व चतु:सिमा दर्शवित नाही. ही बाब समाधानकारक नाही. सीएल-२ अनुज्ञप्ती ही घाऊक विक्रीसाठी द्यावयाची असल्यामुळे दोन ट्रक साठा सहजरित्या राहू शकेल अशी गोडाऊनची जागा असावयास पाहिजे अशी अपेक्षा आहे व त्यासाठी गोडाऊनची जागा कमीत कमी [४५० चौरस फूट] असणे आवश्यक आहे. तेव्हा यापुढे ही बाब लक्षात घेऊन सीएल-२ अनुज्ञप्तीसाठी प्रस्ताव पाठवावा. या क्षेत्रफळापेक्षा गोडाऊनची जागा कमी असेल तर त्या गोडाऊनमध्ये किती साठा मावू शकतो व त्या साठ्याची मोजणी सहजरित्या होऊ शकेल की नाही. याबाबत सुध्दा अभिप्राय द्यावेत.

[ बलदेव चंद ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
[ वर्धा सोडून]

प्रत माहितीसाठी:

१] सर्व विभागीय उप आयुक्त

२] कार्यासन क्रमांक. ५, १५ व ११ [ ५ प्रती]